**पाहिजेत**

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

**पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा**

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी

- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटर वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ३५ वा | शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मंत्र्यांच्या कुत्र्यांनाही विद्यार्थ्यांपेक्षा चांगल्या सुविधा मिळतात

## सरकारी शाळांच्या दुरावस्थेवरून अभिजित दीपके यांचा सरकारवर घणाघात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सरकारी शाळांच्या दुरवस्थेवरून कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी राज्य सरकार आणि शिक्षण विभागावर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. 'राज्यातील सरकारी शाळांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, विद्यार्थ्यांपेक्षा जास्त चांगल्या सुविधा मंत्र्यांच्या कुत्र्यांना मिळतात,' असा घणाघाती आरोप त्यांनी केला आहे. या दुरवस्थेला जबाबदार धरत त्यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

### 'राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनाही बदलावं लागेल'



'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत अभिजित दिपके यांनी लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील उजनी येथील जिल्हा परिषद शाळेची पाहणी केली. या दौऱ्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी शाळांमधील पायाभूत सुविधांच्या अभावावर बोट ठेवले. बहुतांश शाळांमध्ये वर्गखोल्या, बसण्यासाठी बाक, स्वच्छतागृहे आणि शाळेकडे ये-जा करण्यासाठी पक्के रस्ते यांसारख्या मूलभूत सोयींचाही अभाव आहे. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला.

'हा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि जीवाचा प्रश्न आहे. राजकीय नेते विद्यार्थ्यांसाठी काहीही करत नसतील, तर जनतेने त्यांना मते का द्यावीत? लोकांनी केवळ नेत्यांना हेलिकॉप्टरमधून फिरवण्यासाठी मते दिली आहेत का? पालकांनी आपल्या मुलांच्या शाळांची अवस्था प्रत्यक्ष पाहिली पाहिजे,' असे दीपके म्हणाले. तसेच शिक्षणावर काम केल्याशिवाय कोणत्याही पक्षाच्या नेत्यांना मतांसाठी गावाच्या उंबरठ्यावर येऊ देऊ नका, असे आवाहन त्यांनी जनतेला केले. राजकीय स्वार्थासाठी जाती-धर्माचे झेंडे घेऊन रस्त्यावर उतरण्यापेक्षा मुलांच्या शिक्षणासाठी आणि शाळांच्या हक्कासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

**गावोगाव उभारणार 'जंतरमंतर'**

शाळांमधील असुविधा आणि शिक्षणाच्या दजार्बाबत विचारले असता दिपके म्हणाले की, 'आम्ही शाळांमधील गैरसोयींविरोधात गावोगाव आंदोलन करणार आहोत. आता संपूर्ण महाराष्ट्र जागा झाला आहे, कारण हा थेट आपल्या मुलांच्या भविष्याचा प्रश्न आहे. राज्यातील प्रत्येक गावात एक 'जंतरमंतर' उभे राहील,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांच्या भेटीबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, 'अगोदर आम्ही महाराष्ट्रातील सर्व गावकऱ्यांना भेटून जागृती करणार आहोत. त्यानंतर जर मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी भेटायला बोलावले, तर आम्ही नक्की जाऊ.'

दिपके यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील सरकारी शाळांच्या प्रश्नावर आणि शिक्षण खात्याच्या कारभारावर पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

**दिपकेंचा पंतप्रधान मोदींना सवाल**

'पीएम केअर्स फंड'मध्ये सध्या तब्बल ८,४५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी पडून आहे. एवढा मोठा निधी शिल्लक असताना त्याचा वापर जनतेच्या मूलभूत सोयीसुविधांसाठी का केला जात नाही, असा सवाल उपस्थित करत आता 'कॉक्रोच जनता पार्टी'चे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना थेट प्रश्न विचारणारा एक व्हिडिओ शेअर केला आहे.

# मोहोळ मतदारसंघात 37 हजार 262 मतदार अपात्र

## 10.67 टक्के मतदारांच्या नोंदींवर प्रश्नचिन्ह

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात रक्क्र 2026 प्रक्रियेनंतर मोहोळ विधानसभा मतदारसंघातील तब्बल ३७ हजार २६२ मतदार अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. मतदारसंघातील एकूण ३ लाख ४९ हजार ३३८ मतदारांपैकी सुमारे १०.६७ टक्के नोंदी अपात्र आढळल्याने आगामी काळात मतदार यादीत मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्यात आले. या प्रक्रियेत मतदारांचे वास्तव्य, दुबार नोंदी, मृत मतदारांच्या नोंदी तसेच अन्य कारणांमुळे संशयास्पद किंवा अपात्र ठरणाऱ्या नोंदींची पडताळणी करण्यात आली.

मोहोळ मतदारसंघात या पडताळणीनंतर ३७ हजार २६२ मतदारांच्या नोंदी अपात्र ठरल्याचे आकडे समोर आले आहेत. एकूण मतदारसंख्येच्या तुलनेत हा आकडा लक्षणीय असल्याने मतदारसंघातील राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवारांचेही या प्रक्रियेकडे लक्ष लागले आहे.

एसआयआरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे सध्या अपात्र ठरलेल्या नोंदी अंतिम मतदार यादीतून कायमस्वरूपी वगळल्या गेल्या आहेत, असे समजणे योग्य ठरणार नाही. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित मतदारांना आपले नाव यादीत आहे की नाही, याची तपासणी करता येणार आहे.

नाव वगळले असल्यास त्यामागील कारण तपासून नियमानुसार दावा, हरकत किंवा आवश्यक कागदपत्रांसह संबंधित प्रक्रिया करता येणार आहे. त्यामुळे प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्यक्ष चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या ३ लाख ४९ हजार ३३८ आहे. त्यापैकी ३७ हजार २६२ मतदार अपात्र ठरले आहेत. म्हणजेच एकूण मतदारसंख्येच्या जवळपास दहापेक्षा अधिक टक्के नोंदी या प्रक्रियेत अपात्र ठरल्या आहेत.

इतक्या मोठ्या प्रमाणात मतदारांच्या नोंदी अपात्र आढळल्याने मतदार यादीची अचूकता, पडताळणीची प्रक्रिया आणि वगळण्यात आलेल्या नोंदींची कारणे याबाबत राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

प्रारूप मतदार यादी जाहीर झाल्यानंतर प्रत्येक मतदाराने आपले नाव यादीत कायम आहे की नाही, याची खात्री करणे महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः ज्यांचे नाव वगळले गेले असेल, त्यांनी वगळण्याचे कारण तपासून निर्धारित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करणे आवश्यक आहे.

मोहोळमधील रक्क्र्ची आकडेवारी एकीकडे मतदार यादीच्या शुद्धीकरणाची मोठी प्रक्रिया दर्शवते, तर दुसरीकडे ३७ हजारांहून अधिक नोंदी अपात्र ठरणे हे राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे ठरणार आहे. २४ ऑगस्टला प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत नेमके किती मतदार कायम राहतात आणि किती नावे वगळली जातात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मोहोळ विधानसभा मतदारसंघ : SIR 2026**

- एकूण मतदार : ३ लाख ४९ हजार ३३८
- अपात्र मतदार : ३७ हजार २६२
- अपात्र मतदारांचे प्रमाण : सुमारे १०.६७ टक्के
- प्रारूप मतदार यादी : २४ ऑगस्ट २०२६

# अखेर नगर अभियंत्यासह १८ जणांवर दोषारोप निश्चित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत असलेल्या नालेसफाई कामामध्ये गैरप्रकार झाल्याचे मान्य करत याप्रकरणी नियुक्त चौकशी समितीने नगर अभियंत्यासह १८ जणांवर ठपका ठेवला. याप्रकरणी नगरसेवक अनंत जाधव यांनी मोठ्या प्रमाणावर आरोप-प्रत्यारोपांची राळ उठवली होती.

एक्सॅवेटर लाँग बुम म्हणजे पोकलेनचा दर एक तासासाठी ४ हजार ५०० रुपये ठरविण्यात आला. त्याच दराने आठ तासांसाठी ३६ हजार रुपये दर अपेक्षित होता, तरीही ४८ हजार रुपये म्हणजेच ३३.३३ टक्के वाढीव दरास तांत्रिक मान्यता देण्यात आली. यामुळे तब्बल ८१ लाख ३६ हजार ४२८ या अधिकच्या रकमेची बिले मक्तेदारास देण्यात आल्याचे पालिका आयुक्तांना सादर करण्यात आलेल्या अहवालात म्हटले आहे.

तांत्रिक मंजुरी योग्य प्रकारे असतानाही ४०.२० टक्के वाढीव दरास मान्यता देण्यात आली. नगर अभियंता विभागाने शहर सुधारणा विभागाशी समन्वय न साधणे, ई- फाईल न पाठविणे हे चुकीचे असल्याचे अहवालात नमूद आहे. नगर अभियंता सारिका आकुलवार यांनी ११ बिले रिव्हाईज केली. या बिलांवर त्यांनी नियंत्रण अधिकाऱ्यांच्या सह्या घेतलेल्या नाहीत. त्यातून महापालिकेचे ८१ लाख ३६ हजार ४२८ रुपये अधिकचे मक्तेदारास गेल्याचे स्वतः नगर अभियंता आकुलवार यांनी चौकशी समितीपुढे मान्य केल्याचे अहवालात म्हटले आहे.

# ग्रामसेवकांच्या मनमानीला लगाम!

## आता GPS सांगणार 'साहेब' कुठे आहेत?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीमुळे नागरिकांची कामे प्रलंबित राहण्याच्या तक्रारी आता कमी होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी यांची GPS आणि बायोमेट्रिक प्रणालीच्या माध्यमातून हजेरी घेण्याचा निर्णय राज्याच्या ग्रामविकास विभागाने घेतला आहे. याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मंगळवारी लेखी आदेश देण्यात आला.

या निर्णयामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना आता दररोज आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत कार्यालयात आणि गावात उपस्थित राहावे लागणार आहे. GPS आणि बायोमेट्रिक हजेरीच्या माध्यमातून त्यांची उपस्थिती डिजिटल पद्धतीने नोंदवली जाणार असल्याने ग्रामसेवकांच्या कामकाजावर प्रशासनाची अधिक प्रभावी नजर राहणार आहे.

**ग्रामसेवक गैरहजर; गावकऱ्यांचे काम रखडते**

ग्रामीण भागात ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजातील महत्त्वाचा घटक आहे. ग्रामस्थांना विविध शासकीय योजना, दाखले, प्रमाणपत्रे आणि ग्रामपंचायतीशी संबंधित सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ग्रामसेवकांवर असते.

**ग्रामविकास विभागाचा आदेश**



मात्र, ग्रामसेवक कोणतीही पूर्वकल्पना न देता गैरहजर राहत असल्याच्या अनेक तक्रारी आणि घटना समोर आल्या आहेत. ग्रामसेवक कार्यालयात उपलब्ध नसल्याने दाखले, प्रमाणपत्रे तसेच इतर प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना वारंवार ग्रामपंचायत कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. परिणामी अनेक ग्रामस्थांची कामे प्रलंबित राहतात.

आता GPS आणि बायोमेट्रिक हजेरी प्रणालीमुळे अशा प्रकारच्या अनधिकृत गैरहजेरीला लगाम लागण्याची शक्यता आहे. संबंधित अधिकारी नेमक्या ठिकाणी उपस्थित आहेत की नाही, याची पडताळणी GPSच्या माध्यमातून करता येणार आहे. तर बायोमेट्रिक प्रणालीमुळे प्रत्यक्ष उपस्थितीची डिजिटल नोंद उपलब्ध होणार आहे.

एकूणच, ग्रामसेवकांच्या उपस्थितीवर आता 'डिजिटल वॉच' राहणार असून, गावकऱ्यांच्या कामांना होणाऱ्या विलंबावरही यामुळे लगाम लागण्याची अपेक्षा आहे.

# 'पश्चिम महाराष्ट्र राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होता, आता राहिलेला नाही'

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा दावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'एकेकाळी पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला मानला जात होता. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीत हे चित्र आता बदलले असून पश्चिम महाराष्ट्रात भाजपची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे,' असा दावा राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला. भाजपची पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटनात्मक बैठक गुरुवारी सोलापुरातील होटगी रोडवरील हॉटेल बालाजी सरोवर येथे पार पडली. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी हा दावा केला.




या बैठकीला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाचे प्रमुख नेते, आमदार, जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी आणि संघटनात्मक जबाबदारी सांभाळणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुका, मतदार नोंदणी मोहीम, विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) प्रक्रिया आणि पक्ष विस्तार यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

भाजपच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठकीत आगामी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुका लक्षात घेऊन मतदार नोंदणी वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. या निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद वाढविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात (पान 2 वर..)

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या १४ सार्वजनिक ग्रंथालयांना विशेष निधीची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे सोलापूर जिल्ह्यातील १४ सार्वजनिक ग्रंथालयांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या ग्रंथालयांना तातडीने विशेष निधी मंजूर करावा, अशी मागणी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाने ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे विविध ग्रंथालयांमधील पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, फर्निचर तसेच इतर वाचन साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः माढा तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागांतील ग्रंथालयांना याचा मोठा फटका बसला आहे.

निवेदनानुसार, शंभर टक्क्यांपर्यंत नुकसान झालेल्या ग्रंथालयांमध्ये संगम सार्वजनिक वाचनालय, हेद्रा (ता. अक्कलकोट), कै. डॉ. केशवराव राजेगावकर सार्वजनिक वाचनालय, तेलगाव (सिना, ता. उत्तर सोलापूर), श्री. एम. बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय, पाकणी, बकुळाबाई सार्वजनिक वाचनालय, मनगोळी, छत्रपती संभाजी राजे सार्वजनिक वाचनालय, अकोले (मंद्रुप), राजमाता रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते पाटील सार्वजनिक वाचनालय, पोर्ट, माळी सार्वजनिक वाचनालय, वाकाव, समता सार्वजनिक वाचनालय, सुलतानपूर, जय मल्हार सार्वजनिक वाचनालय, शिंगेवाडी, बालाजी (पान 2 वर..)

**ग्रंथालय संघाच्या प्रमुख मागण्या :**

- अतिवृष्टीग्रस्त १४ सार्वजनिक ग्रंथालयांसाठी विशेष निधी मंजूर करावा.
- निधीला तातडीने प्रशासकीय मान्यता द्यावी.
- नुकसानग्रस्त ग्रंथालयांच्या दुरुस्ती व साहित्य खरेदीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत.

**पाहिजेत**

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्विकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-४१३००३.

मो. ९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

# गो-कार्टसह एन. बी. नवले सिंहगडच्या 'टीम वज्रा'ची राष्ट्रीय झेप!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील पहिली इलेक्ट्रिक गो-कार्ट तयार करून Best Acceleration बेस्ट ॲक्सेलेरेशन विभागात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या ह्यटीम वज्रा'ने आता आणखी एक महत्त्वाची झेप घेतली आहे. विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या अत्याधुनिक आयसी इंजिन गो - कार्टसह हा संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पधेर्साठी सज्ज झाला असून, श्रावण महिन्याच्या प्रारंभी शहराचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धेश्वर महाराज मंदिरात या गो-कार्टचे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत विधिवत पूजन करण्यात आले.



गतवर्षी 'टीम वज्रा'ने सोलापूर जिल्ह्यातील पहिली इलेक्ट्रिक गो-कार्ट विकसित करून अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली होती. पुणे येथे झालेल्या स्पर्धेत संघाने आपल्या तांत्रिक कौशल्याची आणि वाहन चालविण्याच्या क्षमतेची छाप पाडत वेगवर्धन विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले होते. या यशानंतर अधिक आव्हानात्मक मोटर वाहन स्पर्धांसाठी संघाने यंदा अंतर्गत ज्वलन इंजिनावर आधारित गो-कार्ट विकसित केले आहे.

या गो-कार्टच्या निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांनी वाहन सांगाड्याची रचना, संगणकीय प्रारूप निर्मिती, निर्मिती व जोडणी, वाहनाची गतिशीलता, इंजिन व इतर यंत्रणांची सांगड आणि प्रत्यक्ष चाचणी अशा वाहन विकासाच्या विविध टप्प्यांवर प्रत्यक्ष काम केले आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर न थांबता प्रत्यक्ष रचना, निर्मिती, चाचणी आणि कार्यक्षमतेत सुधारणा यांचा अनुभव विद्यार्थ्यांना या प्रकल्पातून मिळाला आहे.

१७ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान भोपाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील गो-कार्ट स्पर्धेत 'टीम वज्रा' सहभागी होत असून, देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संघांशी त्यांची स्पर्धा होणार आहे. त्यानंतर ऑक्टोबर २०२६मध्ये कोयंबतूर येथे होणाऱ्या आणखी एका राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतही हा संघ सहभागी होणार आहे.

इलेक्ट्रिक गो-कार्टपासून अंतर्गत ज्वलन इंजिनावर आधारित गो-कार्टपर्यंतचा 'टीम वज्रा'चा प्रवास हा विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण नवकल्पना, व्यावहारिक अभियांत्रिकी ज्ञान आणि मोटर वाहन क्षेत्रातील वाढत्या योगदानाचे प्रतीक ठरत आहे. या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना वाहन रचना, निर्मिती, गतिशीलता, चाचणी, इंजिन यंत्रणा आणि प्रकल्प व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळत आहे.

**३० विद्यार्थ्यांची टीम; एकच ध्येय!**

'टीम वज्रा'मध्ये एकूण ३० विद्यार्थ्यांचा समावेश असून, टीम कॅप्टन प्रसन्ना साठे, उपकर्णधार सुमित तंबाके, उपकर्णधार अनिरुद्ध कामुर्ती, कोषाध्यक्ष यश विन्नू आणि व्यवस्थापक ऋषिकेश देगील यांच्या नेतृत्वाखाली संघाची वाटचाल सुरू आहे. संघातील प्रमुख सदस्यांमध्ये पुष्कर उदगीरी, निखिल हब्बा, ज्ञानेश्वर पुजारी, प्रज्वल साबळे, सौम्य मादगुंडी, महिमा बासुतकर आणि नंदिनी शिंपाळे यांचा समावेश आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कॅम्पस संचालक संजय नवले आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी 'टीम वज्रा'चे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, सीआरटीएडचे संशोधन संचालक प्रा. एस. एच. पवार यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.
सोलापूरच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी विकसित केलेली ही वेगवान झेप आता राष्ट्रीय स्पर्धेच्या मैदानात नवे यश मिळविण्यासाठी सज्ज झाली आहे.

# शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या २ हजार ४२१ पदांसाठी मेगाभरती

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ह्यपवित्रह्ण पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २ हजार ४२१ रिक्त पदे भरण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेमुळे राज्यातील हजारो पात्रताधारक उमेदवारांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर येथील शासकीय आश्रमशाळांतील रिक्त जागांसाठी शिक्षक भरती प्रक्रिया सुरु आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ८२६ पदे असून, त्याखालोखाल ठाणे ६१३ पदे, नागपूर ५१४ पदे तर अमरावती ४६८ पदे भरली जाणार आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशा विविध पदांचा समावेश आहे. शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीमध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार ५३६ पदांचा समावेश आहे. प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ८६२ जागा तर पेसा क्षेत्रामध्ये ४३६ जागा उपलब्ध आहेत. इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांसाठी पेसा व नॉन-पेसा क्षेत्रामध्ये अनुक्रमे ६७ आणि १६१ जागांवर भरती होईल. माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ३५२ तर पेसा क्षेत्रात १३८ जागा उपलब्ध आहेत. माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) पेसा क्षेत्रात ५ आणि नॉन-पेसा क्षेत्रात २२ जागांवर भरती प्रक्रिया पार पडेल.

उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पेसा क्षेत्रामध्ये २५१ आणि नॉन-पेसा क्षेत्रामध्ये १०६ अशा एकूण ३५७ जागा उपलब्ध आहेत. यात मराठी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या उच्च माध्यमिक स्तरावरील विविध शाखांच्या विषयांचा समावेश आहे. आश्रमशाळा शिक्षक भरती प्रक्रियेत स्थानिक व आदिवासी क्षेत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी पेसा आणि नॉन-पेसा क्षेत्रांचे स्पष्ट विभाजन करण्यात आले आहे. यानुसार संपूर्ण भरतीमध्ये पेसा क्षेत्रासाठी ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रासाठी १ हजार ५३६ जागा राखीव आहेत. ही भरती प्रक्रिया ह्यपवित्रह्ण पोर्टलद्वारे अत्यंत पारदर्शकपणे, गुणवत्तेच्या आधारावर आणि नियमानुसारच होत आहे. त्यामुळे उमेदवारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. असे आवाहन आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.


**जाहिर प्रसिध्दीकरण** नि.नं. २९
आर.सी.एस.नं.२८१/२०२६
**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**
कै. देविदास दुबय्या इराबत्ती (मयत)
यांचे कायदेशीर वारसदार
१) संध्या देविदास इराबत्ती,वय:-४० वर्षे,
धंदा:घरकाम, रा.२१६, रविवार पेठ, सोलापूर,
२) ऋतिक देविदास इराबत्ती,वय:-२५ वर्षे,
धंदा:-शिक्षण, रा.२१६, रविवार पेठ, सोलापूर. } वादी
विरूध्द
१) श्रीमती सत्यव्वा चंदप्पा बोळकोठे
वय:-सज्ञान,धंदा:-घरकाम रा.मु.पो. टाकळी,
ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर.
२) श्री. श्रीनिवास नागप्पा गणपा
वय:-५२ वर्षे,धंदा:-नोकरी, रा. ६/१/१,
कुचन नगर, बालाजी मंदिर जवळ, सोलापूर
३) सौ. अनिता शहाजी दुधाळ
वय:-४८ वर्षे,धंदा:-घरकाम,रा.०३
धनलक्ष्मी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, } प्रतिवादी
ज्याअर्थी, प्रस्तुत वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असून सदर दाव्यामध्ये प्रतिवादी नं. १ यांना दाव्यातील नमूद पत्त्यावर समन्स/नोटीसीची बजावणी करण्यास बेलिफ गेले असता प्रतिवादी नं. १ हे सदरच्या पत्त्यावर आढळून येत नाही, असा शेरा मारून परत आलेला आहे. परंतु वादी यांना प्रतिवादी नं. १ यांचा दाव्यातील एकमेव पत्ता माहिती आहे.
त्याअर्थी, प्रतिवादी नं. १ यांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळिवण्यात येते की, हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर पुढील नेमलेली ता.२१/०९/२०२६ रोजी स्वत: अगर नेमलेल्या विधिज्ञांमार्फत हजर राहावे, अन्यथा मे न्यायालय प्रतिवादी नं. १ यांचे गैरहजेरीमध्ये पुढील योग्य तो आदेश करतील, याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.२०/०८/२०२६.
हुकूमावरून
कनिष्ठ लिपीक (शिक्का) अधिक्षक जिल्हा न्यायालय, सोलापूर


# सार्वजनिक विहिरींचे खोलीकरण, आडवे बोर घेण्याच्या शक्यतेची तांत्रिक तपासणी करा - अध्यक्ष दीपक वैद्य

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील पाणीपुरवठा, जलसंधारण, पाणीटंचाई आणि स्वच्छता व्यवस्थेचा सविस्तर आढावा जिल्हा परिषद सोलापूरच्या जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली.



बैठकीस कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामपा चिवडशेट्टी, सदस्या गीतांजली साळुंखे, सदस्य नंदकुमार काळे, सदस्या क्षणमुखी कोरके, सदस्या वंदना कांबळे यांच्यासह जिल्हा परिषदेचे विविध विभागप्रमुख आणि राज्य शासनाच्या संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सभेचे सचिव म्हणून कामकाज पाहिले.

बैठकीत जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना, जलसंधारणाची कामे, भूजल पातळी, पाणीटंचाई, टँकरद्वारे पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था आणि उपलब्ध जलसाठा यांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला.

कृषी विभागाकडील शेततळे योजना, शेततळ्यांची सद्यस्थिती आणि जलसंधारणाच्या माध्यमातून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती घेण्यात आली. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील प्रस्तावित, सुरू, पूर्ण आणि अपूर्ण पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेऊन प्रलंबित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, मनरेगा अंतर्गत जलसंधारणाची कामे यांची प्रगती तपासण्यात आली. उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करून जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा आणि पाणीटंचाईग्रस्त गावांची सद्यस्थिती याचीही माहिती घेण्यात आली. टंचाईग्रस्त गावांमध्ये नागरिकांना पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

**सार्वजनिक विहिरींची तांत्रिक तपासणी**

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक विहिरींच्या माध्यमातून उपलब्ध जलस्रोतांचा अधिक प्रभावी वापर करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. जिल्ह्यातील सार्वजनिक विहिरींची प्रत्यक्ष पाहणी करून आडवे बोर घेणे शक्य आहे का आणि आवश्यकतेनुसार विहिरींचे खोलीकरण करता येईल का, याची तांत्रिक तपासणी करण्याचे निर्देश अध्यक्ष दीपक वैद्य यांनी दिले.

विहिरींची खोली, उपलब्ध पाणीसाठा, जलधारण क्षमता तसेच खोलीकरण किंवा आडवे बोर घेतल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा अंदाज घेऊन सविस्तर तांत्रिक अहवाल तातडीने सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, स्वच्छता विभागाकडील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये, घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचेही नियोजन करण्यात आले. उपलब्ध पाण्याचा पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी गरजेनुसार प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला.

सभेच्या शेवटी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून पाणीटंचाईचे पूर्वनियोजन, जलस्रोतांचे संवर्धन, अपूर्ण कामांची पूर्तता आणि पाणीपुरवठा योजनांना गती देण्याच्या सूचना अध्यक्ष दीपक वैद्य यांनी दिल्या. नागरिकांना पिण्याचे पाणी व स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने नियमित आढावा घेऊन तातडीने कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.


**The Solapur District Central Co-Op. Bank Ltd, Solapur**
207/8/9 Gold finch peth Solalpur

**Tender Notice**

**Sealed Tenders** are hereby invited in a two-bid format for following as specified in the tender documents.
Supply and Installation of Desktop Fake Note Detection-cum-Note Sorting Machines (1+3 Pocket, BIS approved) 5 Qty As per RBI Norms with Buy-back of Existing Machines and Bundle note counting machines 15 Qty.
**(Tender Cost Rs. 10,000/- & EMD Rs. 1 Lacs)**
Tender fees & EMD will be accepted online through RTGS/NEFT.
**Schedule-**
a) Sale of tender document : 21/08/2026 to 31/08/2026
b) Submission of tender : 02/09/2026 up to 05:00 p.m. (Only Hardcopy)
c) Account Name : The Solapur District Central Co-Op. Bank Ltd.
d) Bank Account No. : 000887700000073
e) Bank IFSC Code : YESB0000008
After payment of the tender form fee, detailed information regarding the payment should be communicated via email. The tender form will then be sent by email Solapur D.C.C. Bank reserves the right to accept or reject any or all the tenders without assigning any reason whatsoever. In case of any queries kindly contact on Tel No: 9881482781, email: development@solapurdccb.bank.in and also visit the bank web site at http://www.solapurdccb.bank.in

**Date:21/08/2026**

Sign/-
S/d Rajendra Shinde
**Chief Executive Officer**


# जातीवाचक शिवीगाळ केल्याने मकाईच्या संचालकासह चौघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** शेतातील पिकाचे नुकसान करून जबरदस्तीने रस्ता केलेल्या चौघांवर करमाळा पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झालेल्यांत मकाईचे संचालक सतीश निळ यांचा समावेश आहे. याबाबत नागनाथ वाघमारे (रा. टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर) यांनी १८ ऑगस्ठ रोजी फिर्याद दिली आहे. ५ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वा. च्या सुमारास आप्पा वासुदेव शिंदे, राजेंद्र महिपती रोकडे, संजय येताळा रोकडे, सतिश मधुकर निळ (सर्वजण रा. निमगाव हवेली, ता. करमाळा, जि. सोलापुर) यांनी त्यांना जातीवाचक शिवीगाळ करून,दमदाटी व ठार ठार मारण्याची धमकी देत धक्काबुक्की केली. जबरदस्तीने त्यांच्या शेतातून रस्ता करण्याच्या उद्देशाने त्यांच्या शेतातील ऊस पिकाचे ट्रॅक्टरच्या साहाय्याने नुकसान केले आहे.

वाघमारे यांच्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी आप्पा शिंदे, राजेंद्र रोकडे, संजय रोकडे सतिश मधुकर निळ यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ च्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हि.एस. यांनी बुधवार दि १९ रोजी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हि.एस. या घटनेचा पुढील तपास करत आहेत. याप्रकरणी वाघमारे हे करमाळा तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते.

# माळशिरस तालुका तलाठी संघाच्या अध्यक्षपदी अनिल घेरडे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुका तलाठी संघाच्या अध्यक्षपदी अनिल चंदू घेरडे यांची पुन्हा एकदा निवड झाली. माळशिरस येथील महसूल भवनमध्ये बुधवारी (दि. १९) झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीने ही निवड करण्यात आली. सदस्यांनी घेरडे यांना सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची संधी दिली आहे. तलाठी संघाच्या एकूण ७९ सदस्यांपैकी ६७ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये अनिल घेरडे यांना ४० मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी गणेश शामराव भानवसे यांना १७, तर प्रकाश शिवाजी भोसले यांना १० मते मिळाली. त्यामुळे २३ मतांच्या फरकाने अनिल घेरडे विजयी झाले.



अनिल घेरडे हे यापूर्वी एप्रिल २०२१ ते एप्रिल २०२६ या पंचवार्षिक कालावधीत संघाचे अध्यक्ष होते. त्यांची मुदत एप्रिलमध्ये संपल्यानंतर नवीन निवडणूक होईपर्यंत त्यांनी काळजीवाहू अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली होती. आता झालेल्या निवडणुकीत पुन्हा विजय मिळवत त्यांनी अध्यक्षपद कायम राखले आहे.संघटनेतील इतर पदे अध्यक्षांच्या संमतीने बिनविरोध निवडली जाणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विजयकुमार जाधव, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संदीप चव्हाण यांनी काम पाहिले.


# Classified - छोटी जाहीरात

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव
१७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था
१८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे
४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु - 34

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | | 9 | 2 | | 1 | |
| 4 | | | 8 | | 5 | | 6 | 3 |
| 5 | | 1 | | | | | | 8 |
| 8 | 3 | | 9 | 4 | | | | 7 |
| | 9 | | | | 3 | 2 | | |
| 7 | | 5 | 1 | 2 | | 3 | | |
| 9 | | | 3 | | | 6 | 7 | 2 |
| 2 | | 7 | 4 | | 9 | | | |
| 6 | | | | | 7 | 5 | 4 | |

# डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या विचाराची गरज- मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात परिवर्तन झाले आहे, असे असून देखील अंधश्रद्धा, अफवा आणि अवैज्ञानिक समजुती मुळे समाजाची अवस्था दिशाहीन झाली आहे. अशा स्थितीत डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्या विचारांची गरज आहे असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम कोकळगी, रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, आजचा राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस ज्येष्ठ समाजसुधारक डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त पाळला जातो. आपल्याला ह्लप्रश्न विचारा, पुरावा तपासा आणि सत्य स्वीकाराह्ल हा संदेश त्यांनी दिला वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणारा समाज अधिक प्रगत, विवेकी आणि सक्षम बनतो. असेही त्यांनी सांगितले. म्हणूनच अंधश्रद्धामुक्त आणि प्रगत भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले, आभार प्राध्यापक सौरभ भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा भीम सोनकांबळे, प्रा जनाबाई चौधरी, डॉ बाळासाहेब पाटील, प्रा सोनाली कटकधोंड, प्रा प्राची गणेचारी उपस्थित होते.

**डॉ नरेंद्र दाभोळकर यांचे विवेकवादी कार्य उल्लेखनीय**

डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांनी समाजातील अंधश्रद्धा रूढी परंपरा यांना तिलांजली मिळावी म्हणून आयुष्यभर प्रयत्न केले, त्यांनी विवेक वाहिनी ही वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणारी संघटना कार्यान्वित केली. त्यामुळे विज्ञान व तर्क यांना महत्त्व प्राप्त झाले हे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे असे प्रतिपादन पुनम कोकळगी यांनी केले.

**वैज्ञानिक दृष्टिकोन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घेतली शपथ**

1. रूढी परंपरा अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी प्रयत्न करेन
2. भोंदू बाबा च्या आहारी जाणार नाही
3. समाजामध्ये अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी प्रयत्न करेन
4. विवेक वादी दृष्टिकोन स्वीकारेन
5. वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात यासाठी समाजाचे प्रबोधन करेन
6. स्वातंत्र्य, समता, बंधुता धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यावर निष्ठा ठेवेन

अशी शपथ राष्ट्रीय वैज्ञानिक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी घेतली

# अक्कलकोटमध्ये २५ ऑगस्टला 'नांदी ग्रंथपाल साहित्य संमेलन'

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पुणे येथे २८ ते ३१ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या १००व्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने राज्यभरात ९९ नांदी साहित्य संमेलने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यापैकी अक्कलकोट येथे 'नांदी ग्रंथपाल साहित्य संमेलन' मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे. मैंदर्गी रोडवरील कै. बाळासाहेब इंगळे पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या सभागृहात हे संमेलन होणार असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा अक्कलकोटच्या अध्यक्षा सौ. शैलशिल्पा जाधव यांनी दिली.





संमेलनाच्या अध्यक्षस्थानी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी राहणार असून उद्घाटन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. योगेश सोमण यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कार्यवाह आशुतोष जावडेकर, वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगवले, म.सा.प.चे जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, डॉ. श्रुतिश्री वडकबाळकर आणि कल्याण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

उद्घाटनानंतर डॉ. योगेश सोमण यांचा 'सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर दीर्घांकाचा एक प्रयोग' हा विशेष कार्यक्रम होणार आहे.

दुपारी २.३० वाजता 'साहित्य चळवळीत ग्रंथालयाचे योगदान' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ग्रंथमित्र हरिदास रणदिवे, ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, ग्रंथमित्र गुलाबराव पाटील आणि ग्रंथमित्र जोतिराम गायकवाड सहभागी होणार आहेत.

दुपारी ३.३० वाजता सोलापूर जिल्ह्यातील शतकोत्तर वाचनालयांमध्ये कार्यरत असलेल्या सात ग्रंथपालांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच प्रसिद्ध लेखिका सौ. आरती काळे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सायंकाळी ४ वाजता काव्यवाचनाचा कार्यक्रम होणार असून बद्दीउजमा बिराजदार (सोलापूर) अध्यक्षस्थानी राहणार आहेत. सायंकाळी ५ वाजता संमेलनाचा समारोप होईल. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्माकर कुलकर्णी राहणार असून नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, पंचायत समिती सदस्या कु. शितल म्हेत्रे, श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट, जेऊरचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, माजी नगराध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंडा आणि अश्विनी चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या साहित्य संमेलनास साहित्यप्रेमी, वाचक, ग्रंथपाल तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा अक्कलकोटच्या अध्यक्षा सौ. शैलशिल्पा जाधव यांनी केले आहे.

यावेळी सौ. आरती काळे, सौ. पुष्पा हरवाळकर, प्रा. भीमराव साठे, लक्ष्मण पाटील, दत्तात्रय बाबर, दिनकर शिंपी, बापूजी निंबाळकर, सुभाष सुरवसे, राजू भोसले, कमलाकर सोनकांबळे, श्रीकांत झिपरे आदी उपस्थित होते.

# सामाजिक हुतात्मा डॉ. नरेंद्र दाभोळकर- ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'डॉ. नरेंद्र दाभोळकर, ॲड. गोविंद पानसरे, प्रा. एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश हे सामाजिक हुतात्मे होऊन गेले. समाजातील अंधश्रद्धा रोखण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. सत्य बोलणे, खरं बोलणे हेच 'कटूसत्य' आहे,' असे भावनिक प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले यांनी केले.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या १३व्या स्मृतिदिनानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शहर शाखा, सोलापूरच्या वतीने डॉ. दाभोळकर, ॲड. गोविंद पानसरे, प्रा. एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्यावर आधारित पुस्तकाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना अभिवादन गीताद्वारे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. डॉ. अस्मिता बालगावकर आणि उपस्थितांनी सामूहिकरित्या अभिवादन गीत सादर केले.

यावेळी बोलताना राजेंद्र भोसले यांनी दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या सामाजिक कायार्चा गौरव केला. अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकवाद आणि समाजप्रबोधनासाठी त्यांनी केलेल्या कायार्ची आठवण करून देत त्यांच्या विचारांची आजच्या काळातही गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे कार्याध्यक्ष आर. डी. गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी करून दिला, तर सुजित हावळे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास सुजित हावळे, अण्णा दीक्षित, रामलिंग गायकवाड, विठ्ठल गायकवाड, कुंडलिक मोरे, ब्रह्मानंद धडके, दीपक पांडगळे, निशा भोसले, डॉ. अस्मिता बालगावकर, सुनीता गायकवाड, छाया मोरे, शकुंतला सूर्यवंशी, अरुण गायकवाड, मिलिंद ताकपेरे, सुनील डांगे यांच्यासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये १ हजार घरांच्या गृहप्रकल्पास केंद्र सरकारची मंजुरी

## 'हक्काच्या घराचे' स्वप्न साकारण्यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नांना यश

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी दिलासादायक आणि महत्त्वपूर्ण गृहप्रकल्प लवकरच साकार होणार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजुरी मिळालेल्या सुमारे १ हजार सदनिकांचा भव्य गृहप्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून, या माध्यमातून गरजू कुटुंबांना अल्प किमतीत स्वतःच्या मालकीचे पक्के घर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

आपल्या शहरातील गरजू नागरिकांना हक्काचे घर मिळावे यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि सुयोग्य प्रयत्नांना यश आले आहे. यासाठी केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष सहकार्य लाभले आहे, असे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले आहे.



या प्रकल्पातील सदनिकांमध्ये हॉल, बेडरूम, किचन, संडास-बाथरूम तसेच बाल्कनी यांसारख्या आवश्यक सुविधांचा समावेश असणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा समन्वय साधून केवळ घरकुलच नव्हे, तर लाभार्थ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळणार आहे. अमृत योजना आणि नगरोत्थान योजनेंतर्गत प्रकल्प परिसरात रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. याशिवाय आरडीएसएस योजनेतून आवश्यक विद्युत सुविधा व वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे.

**घरासोबत रोजगारावरही भर**

हा प्रकल्प केवळ घर उपलब्ध करून देण्यापुरता मर्यादित न ठेवता लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणावरही भर देण्यात येणार आहे. कुटुंबातील सदस्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कौशल्य विकास योजनेंतर्गत विविध क्षेत्रांतील प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.सदर प्रकल्पाच्या नियोजन आणि मंजुरीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचेही सहकार्य मिळाले आहे, असे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले आहे.

> 'अक्कलकोट शहरातील कुटुंबांना पक्के घर, प्रत्येक हाताला कौशल्य आणि प्रत्येक कुटुंबाला आर्थिक स्थैर्य या उद्देशाने साकार होणारा हा १,००० सदनिकांचा गृहप्रकल्प अक्कलकोटमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आशेचा नवा किरण ठरणार आहे. घरासोबतच पायाभूत सुविधा, कौशल्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास अनेक कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा आहे.' **- आ. सचिन कल्याणशेट्टी**

# डॉ. उमा प्रधान यांच्या भरतकाम कलाकृतींचे 'Zapurza'मध्ये प्रदर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पारंपरिक हस्तकलेचा समृद्ध वारसा जपत भरतकामाला आधुनिक कलात्मक रूप देणाऱ्या नेत्रतज्ज्ञ डॉ. उमा प्रधान यांच्या भरतकाम कलाकृतींचे विशेष प्रदर्शन २१ ते २७ ऑगस्टदरम्यान पु. ना. गाडगीळ यांच्या 'Zapurza Art Gallery'मध्ये आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाचा कालावधी २१ ते २७ ऑगस्ट असून, सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन रसिकांसाठी खुले राहणार आहे. डफरिन चौक, दमानी ब्लड बँकेसमोर, पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांच्या कलादालनात असलेल्या 'Zapurza Art Gallery' मध्ये हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.





पारंपरिक कलेला प्रोत्साहन देत विविध क्षेत्रांतील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'Zapurza'च्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे. या प्रदर्शनात डॉ. प्रधान यांनी भरतकामाच्या माध्यमातून साकारलेली मानवी चेहऱ्यांची पोर्ट्रेट्स, फुलांची नक्षी, पक्षी, निसर्गदृश्ये आणि विविध कलात्मक रचना रसिकांना पाहता येणार आहेत.

भारताच्या विविध भागांत भरतकामाच्या वैशिष्ट्यपूर्ण शैली प्रचलित आहेत. उत्तर प्रदेशातील चिकनकारी, पंजाबमधील फुलकारी, पश्चिम बंगाल व ओडिशातील कांथा वर्क तसेच काश्मिरी कशिदा या कलाप्रकारांची समृद्ध परंपरा आहे. महाराष्ट्रातही विविध प्रकारच्या टाक्यांचा वापर करून आकर्षक डिझाइन आणि पोर्ट्रेट साकारण्याची परंपरा आहे.

भरतकाम ही अत्यंत संयम, कौशल्य आणि बारकाईची गरज असलेली कला आहे. रंगांची निवड, टाक्यांचे वैविध्य आणि कल्पकतेचा सुरेख मिलाफ डॉ. उमा प्रधान यांच्या कलाकृतींमध्ये पाहायला मिळतो. आधुनिक जीवनशैलीमुळे पारंपरिक हस्तकला नव्या पिढीपासून काहीशी दूर जात असताना, युवकांना या कलेची ओळख व्हावी आणि तिचे महत्त्व समजावे, या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

पारंपरिक कलेचे जतन करून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमाला सोलापूरकर रसिकांनी प्रतिसाद द्यावा. कलाप्रेमी, विद्यार्थी, युवक-युवती तसेच नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन भरतकाम कलेचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे.

# दहावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत तसेच आयटीआयच्या ह्यट्रान्सफर ऑफ क्रेडिटह्ण योजनेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केले आहे.

राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार नियमित शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी आहे. विलंब शुल्कासह अर्ज १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत स्वीकारले जातील. तर अतिविलंब शुल्कासह अर्ज १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत भरता येणार आहेत. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क संकलित करून ते निर्धारित पद्धतीने मंडळाकडे जमा करावे. शुल्क पावत्या व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळांकडे ७ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करावयाची आहे.

मंडळाने सर्व माध्यमिक शाळांना अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांची माहिती अचूक असल्याची खात्री करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अर्जातील नाव, जन्मतारीख व अन्य तपशील काळजीपूर्वक तपासून विद्यार्थी आणि पालकांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अजासीबत छायाचित्र अपलोड करताना निर्धारित निकषांचे पालन करण्याचेही मंडळाने स्पष्ट केले आहे.

मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने सर्व संबंधित शाळा, विद्यार्थी आणि पालकांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी केले आहे.

# जिल्हा न्यायालयात रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव अमोल देशपांडे व धमार्दाय उपआयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या शिबिरात यशोधरा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमार्फत ९०, तर अश्विनी हॉस्पिटलमार्फत ४१ अशा एकूण १३१ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच अश्विनी ब्लड बँकेमार्फत ८१, तर डॉ. हेगडेवार ब्लड बँकेमार्फत ३८ अशा एकूण १२० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

न्यायाधीश वर्ग, न्यायालयीन कर्मचारी, धर्मादाय उपआयुक्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच पदाधिकारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रक्तदान व आरोग्य तपासणीचा एकत्रित विचार करता एकूण २५० जणांनी शिबिराचा लाभ घेतला. रक्तदान हे सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असून एका रक्तदात्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यास मदत होते. या उद्देशाने आयोजित शिबिरातून 'रक्तदान करा... आरोग्यदायी समाज घडवा' हा सामाजिक संदेश देण्यात आला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर, धमार्दाय उपआयुक्त कार्यालय, सोलापूर, अश्विनी हॉस्पिटल, यशोधरा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अश्विनी ब्लड बँक व डॉ. हेगडेवार ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले.

# एकरी १०० मे टन ऊस उत्पादनाकरिता डॉ.संजीव माने यांचे चर्चासत्र संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर अकलूज या साखर कारखान्याच्या वतीने, आयोजीत केलेल्या एकरी १०० मे.टन ऊस उत्पादनाकरिता डॉ. संजीव माने यांचे चर्चासत्राचे आयोजन, बुधवार दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी कारखान्याचे उदय सभागृहात करण्यात आले होते.

सदर चर्चासत्रास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, व्हा.चेअरमन शंकरराव माने-देशमुख, तसेच कारखान्याचे आजी माजी संचालक, कारखान्याकडून राबविण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कार्यक्रमात सहभाग घेतलेले सभासद, तसेच कारखान्याचे विविध विभागीय कार्यालयाकडील प्रगतशील ऊस उत्पादक सभासद, कार्यकारी संचालक यादव, शेतकी विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांमध्ये डॉ. संजीव माने यांनी एकरी १०० मे.टन ऊस उत्पादनाकरिता काय उपाययोजना करावयाच्या याबाबत मार्गदर्शन केले, त्याकरिता त्यांनी ऊस शेती करता पंचसूत्री कार्यक्रम आवश्यक असलेबाबत नमूद केले. त्यामध्ये जमिनीची सुपीकता, लागवड पद्धत, पाणी व्यवस्थापन ,रासायनिक व सेंद्रिय खतांच्या मात्रा, तसेच पीक संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले.

कारखान्याचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ऊस उत्पादक सभासदांकरिता नवीन तंत्रज्ञानाविषयी माहिती सर्व सभासदांपर्यंत देऊन ऊस उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट असून सदर ऊस चर्चासत्र कार्यक्रमाचा फायदा सर्व ऊस उत्पादकांना मोठ्या प्रमाणावरती होणार आहे.

# नागपंचमी महोत्सवात कादंबरी सूर्यवंशीना पैठणी तर,पूजा शिंदेना सोन्याची नथ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना आयोजीत नागपंचमी महोत्सवात पैठणी स्पधेर्तील प्रथम क्रमांकाच्या मानकरी कादंबरी सूर्यवंशीना पैठणी तर,उप विजेत्या पूजा शिंदेना सोन्याची नथ देण्यात आली. रीलमेकींग स्पर्धेत वैशाली वाघमारेनी प्रथम क्रमांक पटकावला.



येथील धवल श्रीराम मंदिरात नागपंचमीनिमित्त दोन दिवसीय महोत्सवात मुली व महिलांसाठी रांगोळी,मेहंदी, पाककला,सौंदर्यप्रसाधन,निबंध, वक्तृत्व,रीलमेकींग तसेच पैठणीच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

सौ.उर्वशीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन तर पद्मजादेवी मोहिते-पाटील करण्यात आले तर रीलस्टार सारिका देवरुखकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी ग्रामीण महिला व मुलींनीही आपल्या कामातून वेळ काढत किंवा करत असलेल्या कमाचीच रील काढून त्यातून जनतेला संदेश देण्याचे आवाहन सारिका देवरुखकर यांनी केले.

अकलूज सारख्या ग्रामीण भागातील महिलांना आपल्या कला सादर करून नागपंचमीचा आनंद घेण्यासाठी स्वतंत्र व सुरक्षीत असे व्यासपीठ स्व.प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी हा उपक्रम गेल्या २५ वर्षांपूर्वी सुरू केला.तो पुढे डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी सुरू ठेवली असून महिलांची सुरक्षित व स्पर्धेच्या संधीचा लाभ महिलांनी घ्यावा,त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन व उत्तेजन देण्यासाठी त्यांनी विविध बक्षिसे ही ठेवली असून आता ज्यांना बक्षिस मिळाली नाहीत,त्यांनी पुढील वर्षीही सहभागी होऊन बक्षिसे मिळावीत असे आवाहन पदमजादेवी मोहिते पाटील यांनी केले.

पैठणी स्पर्धेत शेवटी ५२ महिला उतरल्या होत्या.त्यातून वेगवेगळ्या स्पधेर्तून विजेता व उप विजेता निवडल्या.सांगलीचे आर.जे. बंड्या यांनी या स्पधेर्साठी निवेदनाचे काम केले.

रीलमेकींगमध्ये शिवानी कांबळे द्वितीय तर मिनाज शेख व गौरी भोसले यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला.रांगोळी स्पर्धेत अनुक्रमे कादंबरी सूर्यवंशी,दिव्या आदलिंगे व राणी खरात,मेहंदीमध्ये कोमल नाळे, दिव्या आदलिंगे व वनिता पवार, पाककलेत गौरी भोसले,शीतल ताम्हाणे व नसरीन बागवान तृतीय, मेकअप स्पर्धेत अफसाना मुलाणी,अमृता जगताप व स्वप्नाली घोगरे तृतीय,निबंध स्पर्धेत रुपाली पताळे,क्रांती कानडे, तर वैशाली सुळे व जयश्री गोडसे विभागून तृतीय, वक्तृत्व स्पर्धेत चैताली भंडारे, क्रांती कानडे व वनिता पवार तृतीय याप्रमाणे विजेत्या ठरल्या. परीक्षण वर्षा माने,उमेश शिंदे, आर. जे.बंड्या,पूजा झांबरे,राम देवरुखकर व ज्योती कुंभार यांनी परीक्षण केले.